प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO
WE MAKE CITIES

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६–०६–२००९

# नवी मुंबई विमानतळ उभारणीसाठी असलेले पर्यावरण व कोस्टल रेग्युलेशन झोनचे अडथळे दूर

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी असलेले पर्यावरण व कोस्टल रेग्युलेशन झोनचे अडथळे दूर झाले असून, हे विमानतळ आता कालबध्दरित्या पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या १९ फेब्रुवारी, १९९१च्या नोटिफिकेशननुसार कोस्टल रेग्युलेशन झोनमध्ये उद्योगधंद्यांची स्थापना व विस्तारास नियंत्रण आणण्यात आले होते. नवी मुंबईत होणारे आंतरराष्ट्रीय विमानतळ कोस्टल रेग्युलेशन झोन १, २ आणि ३च्या अंतर्गत येत असल्याने प्रस्तावित विमानतळासाठी या परिसरातील खाडीच्या काही भागांत भराव टाकणे आवश्यक होते. मात्र पर्यावरण व वन मंत्रालयाच्या नोटिफिकेशनमुळे या बाबी करणे अडचणीचे झाले होते. त्यामुळे या नोटिफिकेशनमध्ये नवी मुंबई विमानतळासाठी विशेष दुरुस्ती करण्यात आली आहे. आता पर्यावरण संरक्षणाचे संपूर्ण उपाययोजन करून व सागरी पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळून हे विमानतळ उभारता येणे शक्य होणार आहे.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा हा अडथळा दूर करण्याच्या अनुषंगाने **मा. ना. श्री. अशोक चव्हाण,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी व्यक्तिशः पंतप्रधान **डॉ. मनमोहन सिंग** यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल,** अतिरिक्त मुख्य परिवहन अभियंता **श्री. सत्येंदु सिन्हा** आणि त्यांचे सहकारी यांनीही या बाबीचा पाठपुरावा केला. मुख्य सचिव **श्री. जॉनी जोसेफ** यांनीसुध्दा पंतप्रधान कार्यालयातील प्रधान सचिवांची भेट घेतली व हा प्रकल्प विनाविलंब मार्गी लागावा यासाठी प्रयत्न केले. सुदैवाने पंतप्रधानांकडेच पर्यावरण व वन मंत्रालयाचा कार्यभार असल्याने संपूर्ण प्रक्रियेला गती आली.

कोस्टल रेग्युलेशनविषयक अडथळा दूर झाल्याने आता हे विमानतळ कालबध्दरित्या पूर्ण करण्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक १८ मे रोजी पर्यावरण व वन मंत्रालयाच्या नोटिफिकेशनमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. नवी मुंबई विमानतळाच्या संकल्पचित्राविषयी प्राथमिक अहवाल सल्लागारांकडून प्राप्त झाला आहे. **३१ ऑगस्ट २००९** रोजी अंतिम अहवाल सादर केला जाईल. **३० सप्टेंबर २००९** रोजी विकासकांची निवड करण्यासाठी निविदाविषयक कागदपत्रे तयार केली जातील. १५ फेब्रुवारी २०१० संभाव्य विकासकांकडून अंतिम कागदपत्रे सादर केली जातील. **३१ मार्च २०१०** रोजी विकासकाची निवड केली जाईल. एप्रिल–मे २०१० मध्ये करारावर सह्या व कोनशिला समारंभ केला जाईल. सप्टेंबर–ऑक्टोबर २०१३ मध्ये या विमानतळातील मूलभूत सेवांचे उद्घाटन केले जाईल.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ______________________

______________________